स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

केंद्रिय अर्थसंकल्पाचा विश्लेषणात्मक अभ्यास (२००३-०४ ते २०१७-१८)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्यविद्या शाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएच्.डी.(Ph.D.) प्राप्त करण्यासाठी प्रस्तुत शोध प्रबंधाचा आराखडा

- : संशोधक :-

रविकुमार चंद्रकांत माने

लातूर

- : मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. एस. एस. देवनाळकर

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

: संशोधन केंद्र :

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

जून - २०१९

केंद्रिय अर्थसंकल्पाचा विश्लेषणात्मक अभ्यास (२००३-०४ ते २०१७-१८)

1.प्रस्तावना :

आधुनिक काळात जगातील बहुतांशी राष्ट्रांनी लोकशाही या शासनव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीमध्ये लोकांचे कल्याण महत्त्वाचे असते. लोकशाही शासनव्यवस्थेत लोक हे साध्य तर सरकार हे साधन असते. त्यामुळेच जगातील अनेक राष्ट्रांनी कल्याणकारी राज्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. आधुनिक काळात सर्व देशांचा उद्देश लोकांच्या कल्याणाचे महत्तमीकरण करणे हा आहे. त्यामुळेच आधुनिक काळात सरकारची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

सरकारच्या धोरणाला राजकोषीय धोरण असे म्हटले जाते. सरकार आपल्या योजना तसेच विकासाचा आराखडा राजकोषीय धोरणातून मांडत असते. 1929 च्या जागतिक महामंदीपूर्वी मौद्रिक धोरणाला महत्त्वाचे स्थान होते. मात्र 1929 नंतर सरकारच्या पुर्णतः निर्हस्तक्षेपाच्या धोरणाला अपयश आले. त्यानंतर मात्र मौद्रिक धोरणापेक्षा राजकोषीय धोरणाला महत्त्व प्राप्त झाले. राजकोषीय धोरणाचे मुख्यतः चार साधने आहेत.

1) सार्वजनिक उत्पन्न

2) सार्वजनिक खर्च

3) करारोपन

4) सार्वजनिक कर्ज

या वरिल साधनांबाबत सर्व अंदाज व निर्णय घेण्याचे कार्य अर्थसंकल्पात केले जाते. त्यामुळे खऱ्या अर्थाने देशाच्या विकासासाठी सक्षम अर्थसंकल्प महत्त्वाचा असतो.

अर्थसंकल्पामधून सरकारचे धोरण क्रियान्वित होते. देशातील एखाद्या घटकाचा विकास साध्य करण्यासाठी जी वित्तीय साधने लागतात त्याची तरतूद

अर्थसंकल्पात केली जाते. एखादा घटक विकासापासून वंचित असेल तर त्याच्या विकासासाठी अतिरिक्त तरतूद अर्थसंकल्पात केली जाते. त्यामुळे खऱ्या अर्थाने उपलब्ध संसाधनाद्वारे महत्तम विकास साध्य करण्याचे नियोजन अर्थसंकल्पात केले जाते.

स्वातंत्र्यानंतर दुर्लक्षित घटकांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या. उपलब्ध संसाधने अपुरी पडत असल्याने सार्वजनिक कर्ज मोठ्या प्रमाणात काढण्यात आले. त्यामुळे सरकारच्या विविध तुटीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली. अर्थसंकल्पात या तुटी कमी करण्याचा पहिला प्रयत्न 1991 च्या आर्थिक सुधारणांमध्ये करण्यात आला. या सुधारणांमध्ये विविध करांचे दर कमी करणे, राजकोषीय तुट कमी करणे, मौद्रिक सुधारणा करणे, सरकारची परवाना पध्दती रद्द करणे, विविध निर्बंध काढून टाकणे यांचा समावेश होता. 1991 च्या आर्थिक सुधारणांमध्ये राजकोषीय तुट कमी करणे ही एक महत्त्वपूर्ण तरतूद होती. मात्र ही तुट अपेक्षे इतकी कमी झाली नाही. त्यामुळेच 2003 मध्ये डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षेतेखाली FRBM कायदा अंमलबजावणी (Task Force on Implementation for FRBM Act) कार्यगट नेमण्यात आला. या कार्यगटाने जुलै 2004 मध्ये कायदेविषयक अहवाल सादर केला. यामध्ये पुढिल लक्ष्ये ठेवण्यात आले.

1. राजकोषीय तुट दरवर्षी 0.3 टक्क्यांनी कमी करणे व 2008-09 मध्ये 2.8 टक्क्यांवर आणणे.
2. महसूली तुट दरवर्षी 0.5 टक्क्यांनी कमी करणे व 2008-09 मध्ये 0.2 टक्के महसूली आधिक्य निर्माण करणे.
3. कर व GDP चे प्रमाण 2008-09 पर्यंत 13.2 टक्क्यांपर्यंत आणणे.
4. अर्थसंकल्पीय खर्चाचे GDP शी प्रमाण 2008-09 पर्यंत 14.3 टक्के करणे.

FRBM कायदा मुख्यत: पारदर्शक राजकोषीय व्यवस्थापन यंत्रणा विकसित करणे व दीर्घकालीन राजकोषीय स्थैर्य प्रस्थापित करणे यासाठी करण्यात आला.

प्रस्तुत शोध निबंधात FRBM कायद्यानंतर पंधरा वर्षाच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

2) संशोधन विषयाचे महत्त्व :

1. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून 2003-04 ते 2017-18 या काळातील अर्थसंकल्पाचा कल लक्षात येईल.
2. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून FRBM कायद्यानंतर विविध तुटीत झालेला बदल लक्षात येईल.
3. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून सरकारच्या सबसिडीवर होणारा खर्च लक्षात येईल.
4. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून सरकारचा खर्च जास्त असण्यास जबाबदार घटकांची माहिती होण्यास मदत होईल.
5. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून देशांची राजकोषीय दृढता लक्षात येते.

3) संशोधनाचे शिर्षक:

'केंद्रिय अर्थसंकल्पाचा विश्लेषणात्मक अभ्यास (2003-04 ते 2017-18)'

4) संशोधन समस्या :

1. FBRM कायदा विविध तूट रोखण्यात यशस्वी ठरला आहे काय?
2. सरकारचा खर्च सरकारच्या अपेक्षा सतत जास्त का राहिला आहे?
3. सरकाच्या जमेचा व सरकारच्या खर्चाचा कल कसा आहे?

5) संशोधनाची उद्दिष्टये :

1. भारताच्या अंदाजपत्रकाची संरचना अभ्यासणे.
2. अभ्यास काळातील महसूली जमा आणि भांडवली जमेचा कल अभ्यासणे.
3. अभ्यास काळातील महसूली खर्च आणि भांडवली खर्चाचा अभ्यास करणे.
4. सरकारच्या विविध सबसिडीवर होत असलेल्या खर्चाचा अभ्यास करणे.
5. अभ्यास काळातील विविध तुटींचा कल अभ्यासणे.

6) संशोधनाची गृहितके :

'केंद्रिय अर्थसंकल्पाचा विश्लेषणात्मक अभ्यास (2003-04 ते 2017-18)' चा प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी खालील गृहितके विचारात घेतली जाणार आहेत.

1. सबसिडीवरील खर्च व विविध तुटी यामध्ये धनात्मक सहसंबंध आहे.
2. महसुली खर्च आणि भांडवली खर्च यामध्ये ऋणात्मक सहसंबंध आहे.
3. FBRM कायद्यानंतर सरकारच्या विविध तुटीत घट झाली आहे.
4. भांडवली जमा व सार्वजनिक खर्च यामध्ये धनात्मक सहसंबंध आहे.
5. सबसिडीवरील खर्च व सार्वजनिक जमा यामध्ये धनात्मक सहसंबंध आहे.

7.संशोधन पद्धती

7.1 अभ्यासाचा कालावधी :

प्रस्तुत संशोधनात 15 वर्षाचा कालखंड घेण्यात आलेला आहे. हा कालखंड 2003-04 ते 2017-18 या काळासाठीच आहे. हा कालखंड घेण्याचे मुख्य कारण 2003 मध्ये करण्यात आलेला FRBM कायदा हा आहे. या कायद्यात केंद्र सरकारची महसुली तूट आणि राजकोषीय तुट कमी करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली होती. यामुळे 2003 -04 नंतरच्या 15 वर्षात या कायद्याची अंमलबजावणी कशी झाली व महसुली तूट आणि राजकोषीय कल कसा राहील हे अभ्यासण्यासाठी 2003 - 04 ते 2017-18 हा कालावधी अभ्यासासाठी घेतला आहे.

7.2 तथ्य संकलन पद्धती :

प्रस्तुत संशोधनामध्ये फक्त उपलब्ध द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर केलेला आहे. द्वितीयक माहिती म्हणजे स्वत: गोळा न केलेली माहिती मात्र ती माहिती कोणीतरी गोळा करून प्रसिद्ध केलेली असते. अभ्यास विषयाची माहिती विविध द्वितीयक स्त्रोतापासून जमा केलेली आहे. उदा. भारतीय अर्थव्यवस्थेसंदर्भातील सांख्यकिय प्रकाशने.

7.3 तथ्याचे विश्लेषण आणि वर्गीकरण :

प्रस्तुत संशोधनात सार्वजनिक जमा, सार्वजनिक खर्च व सरकारच्या विविध तुटीचा कल अभ्यासण्यासाठीचे कलरेषाचा वापर केला जाणार आहे. या व्यतिरिक्त विविध निष्कर्ष काढण्यासाठी समांतर माध्य, प्रमाण विचलन या सांख्यकिय तंत्राचा उपयोग केला जाणार आहे. तसेच विविध चलातील संबंध दाखवण्यासाठी सहसंबंधाचा वापर व विविध चलाचे वितरण दाखविण्यासाठी सर्वसाधारण वक्र याचा वापर करण्यात येणार आहे.

8. संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात केंद्रिय अर्थसंकल्प विचारात घेण्यात आलेला आहे. त्यामुळे संशोधनाची व्याप्ती भारत या देशापुरती मर्यादित आहे. तसेच संशोधन हे 2003 - 04 ते 2017-18 या विशिष्ट काळाचेच करण्यात आलेले आहे. तसेच संशोधनात विशिष्ट चलाचाच वापर करण्यात येणार आहे.

9. संशोधनाच्या मर्यादा :

या संशोधनात पुढील मर्यादा आहेत.

1) हा अभ्यास 2003-04 ते 2017-18 या 15 वर्षापुरताच मर्यादित आहे. म्हणून यातून निघालेले निष्कर्ष फक्त अभ्यास काळालाच लागू होतात.

2) या अभ्यासात फक्त केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास केलेला आहे. कोणत्याही राज्याशी याची तुलना केलेली नाही.

3) महसुली जमेत कर महसुलाचा अभ्यास करताना फक्त ठराविकच प्रतयक्ष आणि अप्रत्यक्ष कर घेतलेले आहेत.

4) या अभ्यासासाठी आवश्यक असलेल्या माहितीचे संग्रहण द्वितीयक स्त्रोतापासून केले आहे.

5) केंद्र सरकारच्या सबसिडीचा अभ्यास करताना फक्त काही ठराविक सबसिडीची निवड केली आहे.

प्रकरण विभागणी

प्रकरण 1. प्रस्तावना व संशोधन पध्दती

: प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाच्या पहिल्या प्रकरणात केंद्रिय अर्थसंकल्पाचे स्पष्टीकरण करण्यात येणार आहे. तसेच या प्रकरणामध्ये समस्येचे विधान, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधन पद्धती, संशोधनाच्या मर्यादा या संदर्भात मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण 2. साहित्याचे पुनरावलोकन

: या प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या संदर्भात पूर्वी झालेल्या महत्वाच्या संशोधनाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण 3. भारतीय अर्थसंकल्पाची संरचना

: हे प्रकरण भारतीय अर्थसंकल्पाच्या संरचनेचे आहे. यामध्ये भारतीय अर्थसंकल्पाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भारतीय अर्थसंकल्पाचे वर्गीकरण, अर्थसंकल्पाचे प्रकार आणि विविध अर्थसंकल्पिय तुटी आणि त्याचा ध्वनितार्थ दर्शविण्यात येणार आहे.

प्रकरण 4. भारतीय अर्थसंकलपाच्या जमेचा कल आणि वृद्धी

: प्रस्तुत प्रकरणात केंद्र सरकारच्या महसुली जमा व भांडवली जमेची वृद्धी व कल दर्शविण्यात येणार आहे.

प्रकरण 5. भारतीय अर्थसंकल्पाच्या खर्चाचा कल आणि वृद्धी

: प्रस्तुत प्रकरणात भारत सरकारच्या महसुली खर्च आणि भांडवली खर्चाचा कल आणि वृद्धी दर्शवली आहे. तसेच सबसिडीवर होणाऱ्या खर्चाचा कल दर्शविण्यात येणार आहे.

प्रकरण 6. विविध अर्थसंकल्पीय तुटीचा कल

: या प्रकरणात महसुली तूट, राजकोषीय तूट व प्राथमिक तूट यांचा कल तसेच विविध तुटींचे GDP शी असणारे प्रमाण दर्शविण्यात येणार आहे.

प्रकरण 7. सारांश, निष्कर्ष व शिफारशी

: या प्रकरणात तथ्य विश्लेषणाच्या आधारे निष्कर्ष काढले जाणार आहेत. तसेच राजकोषीय दृढीकरणासाठी काही शिफारशी केल्या जाणार आहेत.

७. संदर्भ ग्रंथ :

१. ओझरकर सु.रा., राजस्व, विद्या प्रकाशन, नागपूर.

२. देसले किरण जी, स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव.

३. कोळंबे रंजन, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे.

४. पंडित नलिनी (२००४), जागतिकीकरण आणि भारत अक्षर प्रकाशन, मुंबई.

५. खैरनार दिलीप, (२०११), प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी, डायमंड प्रकाशन, पुणे.

६. सोमण मा. (२००९), सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

7. Misra S.K., Puri V.K., Public Expenditure in India, Indian Economy, Himalaya Publishing house, New Delhi, 2005.

संकेत स्थळे :

- www.indiabudget.org.
- www.economicservey.com
- www.ministreyoffinance/publicfinancestatistic
- www.rbi.com
- www.finanacecommission.in

संशोधक

रविकुमार चंद्रकांत माने

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस.एस. देवनाळकर

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय,निलंगा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्य विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएच्.डी.(Ph.D.) प्राप्त करण्यासाठी प्रस्तुत शोध प्रबंधाचा आराखडा

केंद्रिय अर्थसंकल्पाचा विश्लेषणात्मक अभ्यास (२००३-०४ ते २०१७-१८)

संशोधकाचे नाव :-	***रविकुमार चंद्रकांत माने***
विषय :	*अर्थशास्त्र*
मो. नं.:	8698796326
प्रवर्ग :	*खुला (मराठा-SEBC)*
पत्ता :	*मु. पो. सेलू, ता. औसा, जि. लातूर.*
ई-मेल :	*ravikumarmane९२९*@gmail.com

मार्गदर्शकाचे नाव :	***प्रा. डॉ.एस. एस. देवनाळकर***
महाविद्यालयाचे नाव :	अर्थशास्त्र विभाग, प्रमुख महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा
मो. न. :	9850037250
ई-मेल :	sdevnalkar44@gmail.com